Date : Nov 15, 2013

गौरी इंगळे, यांस (मालक)

सप्रेम नमस्कार.

एकांत
९ नोव्हें. ते ११ नोव्हें.

पर्यटक:- राजेश अरविंद गुर्जे. (४६)
एअर इंडीया: इंजीनिअर

रहाणार:- 1/20 RDP, 301 GORAI
CHANDRANEEL CHS, GORAI
BORIVALI (W), MUMBAI -91

कोल्हापूर हे माझे शैक्षणिक गावं. ४ वर्षे इंजिनिअरिंग इथेच केले. D.Y. Patil collage of Engeneering.
कोल्हापूरबद्दल प्रचंड आपुलकि. महालक्ष्मीचे दर्शन दरवर्षी घ्यायचं. पण अशी शांत जागा कुठे कि जिथे शांतपणे रहावे आणि नुसता आराम करावा ह्याचा शोध चालू होता. पदमा खानावळीत आम्ही नेहमी एक जेवण तर ठरलेलं असं. मागच्या वर्षीचं एक कार्ड मिळालं त्यातील माहिती जरा वेगळी वाटली. मुंबईतली धावपळ बाजुला ठेवून परिवारासह इथे यायचा प्लॅन केला. गौरी इंगळेशी बोललो आणि जागा बुक केली. त्यांनी सांगितल्याप्रमाणे खरंच आरामच आराम. आहे इथे. शांतता शांतता शांतता...
इकडची माणसे इतकी आपुलकीची वाटली. सर्व प्रकारची काळजी घेणारी. सांगितलेली प्रत्येक कामे करणारी आणि जेवणतर अप्रतिमच. काही पदार्थतर मुंबईत मिळणारच नाही. मीतर बायकोला त्याची रेसिपी शिकून घ्यायला सांगितली त्यप्रमाणे त्यांना विचारलेहि! त्यांनी समजावून सांगितले ते पक्कं डोक्यातही बसले. माझ्या आईवडीलनाही इथे येऊन आराम वाटला. वेळेवर खाणं प्रत्येक ठिकाणी मिळत नाही पण इथे आमची अगदी खातिरदारी केली.
परिसरतर खुपच छान आहे. प्रथम कुटीरमध्ये राहिलो. तीही मजा औरच होती. अशा जागी प्रथमच राहिलो. मग म्हटलं बंगला घेऊ. तिथली मजाही अनुभवू. पण दोन्ही ठीकाणे खुप सुंदर. सकाळी पक्ष्यांचा किलबिलाट आणि रात्री शांतता... सुंदर !!